**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**मंगळवार दिनांक १४ जुलै २०२६**

**ठळक बातम्या**

1. **रेल्वेसाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेकरता रेल भूमी हे नवीन पोर्टल सुरू करण्याची रेल्वेमंत्र्यांची घोषणा.**
2. **असंसर्गजन्य रोग हे बालपणापासून झपाट्याने वाढत असून त्यासंदर्भात मीडियामध्ये जनजागृती आवश्यक- पश्चिम क्षेत्राच्या माहिती प्रसारण मंत्रालयाच्या महासंचालक स्मिता वत्स शर्मा यांचे प्रतिपादन.**
3. **महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम, २०१३ मध्ये सुधारणा करायला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी.**
4. **पत्रसूचना कार्यालयाच्या वतीने नागपूर इथं आयोजित 'भारताच्या सर्जनशील अर्थव्यवस्थेसाठी मनुष्यबळाची सज्जता यासंदर्भात कार्यशाळेचं आयोजन.**

अश्विनी वैष्णव

रेल्वेच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेचं व्यवस्थापन व्हावं या उद्देशान रेल भूमी या नावान पोर्टल सुरू करण्यात येईल, अशी घोषणा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. नवी दिल्ली इथे भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी हाती घेतलेल्या सुधारणांबाबत ते आज पत्रकारांशी बोलत होते. रेल्वे मंत्रालयान बांधकामासह अन्य क्षेत्रात सुधारणा केल्या आहेत. आता खतांची वाहतूकही रेल्वे कंटेनरमधून केली जाऊ शकते. विद्युत निर्मिती प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या फ्लाय ॲश राखेची वाहतूक आता कंटेनरमधून केली जाईल, असं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले.....

राखेच्या वाहतुकीसाठी एकिकृत परवाना प्रणालीची घोषणाही अश्विनी वैष्णव यांनी यावेळी केली. ही प्रणाली जास्तीत जास्त दोन वर्षात सर्व प्रकल्पांमध्ये लागू केली जाईल, असं ते म्हणाले.

क्षमता बांधणी कार्यशाळा

युनिसेफ, पत्र सूचना कार्यालय आणि एम्स नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसार माध्यमांचा प्रतिनिधीसाठी बालपणातील असंसर्गजन्य रोग याविषयी क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन आज एम्स नागपूर येथे करण्यात आले. यावेळी बोलताना पश्चिम क्षेत्राच्या माहिती प्रसारण मंत्रालयाच्या महासंचालक स्मिता वत्स शर्मा यांनी सांगितलं की असंसर्गजन्य रोग हे बालपणापासून झपाट्यान वाढत असून त्या संदर्भात मीडिया मध्ये जनजागृती व्हावी आणि आपल्या भावी पिढीचे संरक्षण या रोगांपासून व्हावे याकरिता या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक डॉ प्रशांत जोशी यांनी सांगितले की लहान मुलांमध्ये मोबाईल, जंक फूड यांच्या सवयीमुळे नॉन कम्युनिकेबल डिसीज अर्थात असंसर्गजन्य रोग जसे लठ्ठपणा मानसिक आजार मधुमेह हे बालपणापासूनच बालकांना ग्रासत असून त्यांच्या शीघ्र निदान आणि उपचारासाठी या कार्यशाळेमध्ये प्रसार माध्यमांना माहितीपर मार्गदर्शन केले जात आहे....

यनिसेफचे क्षेत्रीय संचालक संजय सिंग यांनी सुद्धा आता रोगाचा प्रसार हा संसर्गजन्य रोगांकडून आता असंसर्ग रोगांकडे जास्त वाढला आहे त्यासंदर्भात प्रसार माध्यमांमध्ये देखील जनजागृती होणे आवश्यक असल्याचं नमूद केलं. या कार्यशाळेत पश्चिम क्षेत्रातील प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

चलन फुगवटा

पश्चिम आशियातला संघर्ष आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीत झालेली जहाजांची नाकेबंदी यांमुळे घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलन फुगवट्याचा दर जून महिन्यात वाढून ९ पूर्णांक ८७ शतांश टक्क्यांवर पोहोचला आहे. उद्योग आणि वाणिज्य मंत्रालयान ही माहिती दिली आहे. मे महिन्यात हा दर ९ पूर्णांक ६८ शतांश टक्के इतका होता. खनिज तेलं आणि संबंधित उत्पादनं, अन्नपदार्थ, मूलभूत धातूंचं

उत्पादन आणि रसायनं आणि रासायनिक उत्पादन हे या वाढीमागचे मुख्य घटक ठरल्याचं मंत्रालयान म्हटलं आहे. तर ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलन फुगवट्याचा दर मात्र जून महिन्यात ७ पूर्णांक ४८ टक्क्यांवर कायम राहिला आहे. रिझर्व्ह बँकेन चालू आर्थिक वर्षासाठी चलन फुगवट्याचा अंदाज ४ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांवरून ५ पूर्णांक १ दशांश टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. वाढलेला उत्पादन खर्च आणि जागतिक स्तरावर वाढलेल्या उर्जेच्या किमतीचा इंधन दरांवर झालेला परिणाम यांमुळे आरबीआयन ही वाढ केली आहे.

व्यापार करार

भारत आणि युनायटेड किंगडम दरम्यानचा सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार उद्यापासून लागू होणार आहे. या महत्त्वाच्या करारामुळे भारतातून युके मध्ये होणाऱ्या ९९ टक्के निर्यातीवर कोणतंही शुल्क आकारलं जाणार नाही. परस्परांबरोबरची धोरणात्मक भागीदारी दृढ करून नागरिकांना समृद्धी मिळवून देण्याच्या दिशेन हे महत्वाचं पाऊल समजलं जात आहे.

सीबीएसई

सीबीएसई, अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं आज आपली R3, म्हणजेच त्रिभाषा सूत्राबाबतची भूमिका जारी केली. त्यानुसार, सीबीएसई अंतर्गत येणाऱ्या तिसऱ्या भाषेचं मूल्यांकन केवळ शाळेतल्या अंतर्गत परीक्षांद्वारेच केलं जाईल. तसंच चालू शैक्षणिक वर्षात सीबीएसई बोर्ड तिसऱ्या भाषेची परीक्षा घेणार नाही. ९ वी मध्ये जे विद्यार्थी R3 मध्ये उत्तीर्ण होणार नाहीत, त्यांना १० वी मध्ये प्रवेश दिला जाईल, मात्र त्यांनी १० वीच्या वर्षात ही परीक्षा उत्तीर्ण होणं आवश्यक आहे. इयत्ता ८ वी मधीली तीन भाषांची निवड इयत्ता ९ वी मध्येही कायम राहील आणि त्यापैकी एका भाषेची निवड 'R3' म्हणून करावी लागेल, असं सीबीएसई नं स्पष्ट केलं आहे.

गोपाळ गणेश आगरकर

थोर तत्वचिंतक, शिक्षणतज्ञ, समाजसुधारक, पत्रकार आणि स्वातंत्र्यसैनिक गोपाळ गणेश आगरकर यांची आज जयंती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आगरकर यांना वंदन करत आदरांजली वाहिली आहे.

सामंजस्य करार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था यांच्यात मंत्रालयात कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारामुळे राज्यातील श्रम शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास आणि उद्योगाभिमुख मनुष्यबळ निर्मितीला नवी गती मिळेल, असा विश्वास मंत्री फुंडकर यांनी व्यक्त केला.

मंत्रिमंडळ निर्णय

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम, २०१३ मध्ये सुधारणा करायला राज्य मंत्रिमंडळानं आज  मंजुरी दिली. राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचा आणि महामंडळाच्या जागांचा विकास करायला मान्यता मिळाली. राज्यातल्या  नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्तांसाठी मुद्रीकरण धोरणाला आज मंजुरी मिळाली. यामुळे मालमत्तांच्या वापरातून पारदर्शक आणि अधिक चांगले उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करता येतील. तसंच अल्पकालीन आणि दीर्घकालीन नियोजनातून महापालिका, नगरपालिका, नगरपररिषदा, नगरपंचायतींना मिळकतीचे उपाय शोधता येतील. राज्यात केंद्र शासन पुरस्कृत अर्बन चॅलेंज फंड अभियान राबवलं जाणार असून, शहरांना दर्जेदार पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी बाजाराधारित वित्तपुरवठा मिळविता येईल.

पीआयबी वर्कशॉप

चित्रपट निर्माते, रील मेकर फुड ब्लॉगर हे आपल्या आशय निर्मितीन भारताच्या ऑरेंज अर्थव्यवस्थेला बळकटी देत असून सध्या जागातिक ऑरेंज अर्थव्यवस्थेत 3 टक्के योगदान असलेल्या भारताचे पुढील 10वर्षात 12 ते 15 टक्के योगदान नेण्याचे उद्दिष्ट असून त्या दिशेने आयसीटी प्रयत्नशील आहे, अस प्रतिपादन

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी- आयआयसीटीचे कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ.आशिष कुलकर्णी यांनी आज केले. पत्र सूचना कार्यालयाच्या वतीन स्थानिक चिटणीस सेंटर येथे आयोजित 'भारताच्या सर्जनशील अर्थव्यवस्थेसाठी मनुष्यबळाची सज्जता' यासंदर्भातील एका कार्यशाळेचे आयोजन आज पश्चिम क्षेत्राच्या माहिती प्रसारण मंत्रालय केंद्राच्या महासंचालक स्मिता वत्स शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली प्रसारमाध्यमांच्या संपादक आणि प्रतिनिधींसाठी करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते. मुंबईमध्ये ॲनिमेशन व्हिडिओ ग्राफिक्स कॉमिक्स आणि गेम्स अर्थात एवीसीजी या क्षेत्रात कौशल्याधारीत अभ्यासक्रम राबवणारे आयआयसीटीचे केंद्र हे 'हब आणि स्पोक 'मॉडेलवर काम करनार असून मुख्यालय असलेल्या मुंबई केंद्रावरील हे अभ्यासक्रम आता निम्न - शहरी क्षेत्रीय केंद्रावर देखील उपलब्ध होतील अशी माहिती डॉ.कुलकर्णी यांनी दिली. लहानपणापासून मुलांना सर्जनशील क्षेत्राची ओळख व्हावी याकरिता आयआयसीटी आणि एनसीईआरटी द्वारा निर्मित अभ्यासक्रम देखील राबवले जातील .देशभरात 500 महाविद्यालय आणि 15,000 शाळा पर्यंत 'कौशल बोध 'या कार्यक्रमाद्वारे कन्टेन्ट क्रिएशन प्रयोगशाळा देखील बनवण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली .......

याप्रसंगी महासंचालक स्मिता वत्स शर्मा यांनी माहिती प्रसारण मंत्रालयाच्या विविध उपक्रमाबद्दल उपस्थित त्यांना माहिती दिली.

'बोंबाबोंब आंदोलन'

विदर्भाच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे राज्य सरकारन दुर्लक्ष केल्याचा आरोप करत विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीन नागपूरच्या व्हेरायटी चौकात आज 'बोंबाबोंब आंदोलन' करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजी करत राज्य सरकार आणि विदर्भातील आमदारांविरोधात निषेध व्यक्त केला. पावसाळी अधिवेशनात विदर्भातील शेतकरी, सिंचन आणि रोजगाराच्या प्रश्नांवर ठोस निर्णय न झाल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

****